सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे तसेच तद्नुषंगिक कार्यवाही करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

आदेश क्रमांक: रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब)
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १५/०२/२०२४

वाचा:

१) राज्य निवडणूक आयोगाचे क्र. एसइसी १०९५/१०१/डेस्क ३, दि. ०७/०२/१९९५ चे आदेश
२) राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक रानिआ- २०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दि.१५/१०/२०१६, दि.२५/१०/२०१६, दि.०२/०२/२०१७, दि.०७/०९/२०२१ आणि दि.२४/०१/२०२३ चे आदेश
३) राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.०४/का.११, दि.२०/१०/२०१६ आणि दि. २४/११/२०२१ च्या अधिसूचना
४) राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का-८, दि.२४/१२/२०२० चे आदेश
५) राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापनि-२०२३/प्र.क्र.०६/का-८, दि.२०/०७/२०२३ चे आदेश

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय वातावरणात व पारदर्शक पध्दतीने घेण्याची पूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे;

ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.५७५६/२००५, श्री.किशनसिंग तोमर वि. अहमदाबाद महानगरपालिका व इतर मध्ये दि.१९/१०/२००६ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा, अधिकार व जबाबदाऱ्या भारत निवडणूक आयोगाशी समतुल्य आहेत, असे नमूद करण्यात आलेले आहे;

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगावर असलेली सांविधानिक जबाबदारी योग्यरितीने पार पाडण्याच्या दृष्टीने भारत निवडणूक आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या वेळी ज्या पध्दतीने व ज्या बाबींवर कार्यवाही केली जाते त्या सर्व बाबींवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यावेळी आवश्यकतेनुसार कार्यवाही केली जाणे अपेक्षित आहे.

ज्याअर्थी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब आयोगाने निर्धारित केलेल्या कालावधीमध्ये आणि विहित केलेल्या रितीने सादर करण्यात कसूर करणाऱ्या उमेदवारास अनर्ह ठरविण्याची तरतूद मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ (१ई), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १० (१ई), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १६ (१ड), महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १५-ब (१) आणि ५८ (१ई) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १४-ब (१) मध्ये करण्यात आली आहे;

ज्याअर्थी, उपरोक्त तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी संदर्भाधीन आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशांची अंमलबजावणी करताना क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून नेमका अर्थ काढताना होणारा संभ्रम दूर करणे, उमेदवारांना सदर आदेशांची अंमलबजावणी करतना काही व्यावहारीक अडचणी येत असणे, तांत्रिक व क्षुल्लक कारणावरुन मोठया प्रमाणात अनर्ह ठरविणे, न्यायालयाने विविध याचिकांमध्ये वेळोवेळी पारित केलेल्या आदेशांची दखल घेऊन राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशामध्ये सुधारणा करणे, आदेशाच्या अंमलबजवणीमध्ये एकसूत्रता आणणे, निवडणुकीशी संबंधित विविध घटकांनी करावयाची कार्यवाही निश्चित करणे, माहिती तंत्रज्ञान आज्ञावलींचा अंगिकार करणे इ. बाबी विचारात घेऊन एकत्रित आदेश देखील निर्गमित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, राजकीय पक्षांकडून दरवर्षी वार्षिक लेखा परीक्षित लेख्याची प्रत आणि संबंधित वर्षातील भरलेल्या आयकर विविरणाची (रिटर्नची) एक प्रत संबंधित वित्तीय वर्ष संपल्यापासून एका वर्षांच्या आत आयोगाच्या कार्यालयास देणे आवश्यक असते. त्यामुळे राजकीय पक्षांकडून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय निवडणुकांसाठी करण्यात येणारा खर्च स्वतंत्रपणे सादर करण्याबाबतचे आदेश देखील अधिक्रमित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए; तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८अ (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ (४), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०-अ (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९ अ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-अ (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र संदर्भाधीन सर्व आदेश अधिक्रमित करून खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

१. **उमेदवारांनी विहित मुदतीत निवडणूक खर्च दाखल करणे अनिवार्य:-** स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका लढविणाऱ्या उमेदवारांनी संबंधित सर्व अधिनियमातील तरतुदींनुसार निवडणुकीवर केलेल्या खर्चाचा हिशोब राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या वेळेत व रितीने (Time & Manner) सादर करणे अनिवार्य आहे. **सदर तरतूद बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांनादेखील लागू राहील.**

२. **उमेदवार व उमेदवारांसाठी निवडणूक खर्चाचे स्रोत खालील प्रमाणे असतात:-**

(अ) उमेदवाराने स्वत: अगर त्याच्या प्रतिनिधीने केलेला खर्च.

(ब) राजकीय पक्षाने केलेला खर्च (याबाबत स्वतंत्र आदेश आहेत.)

(क) इतर व्यक्ती (जसे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी, हितचिंतक, समर्थक इ.) किंवा संस्थेने त्यांच्यावर केलेला खर्च.

३. **निवडणूक खर्चाची मर्यादा:-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवाराने करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार राहील.

३.१ **राजकीय पक्षाने केलेला एकत्रित खर्च:-** राजकीय पक्षातर्फे निवडणुकीत उमेदवारांसाठी एकत्रित खर्च करण्यात येतो. सदर खर्च संबंधित उमेदवारांमध्ये विभाजित करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे स्वतंत्र आदेश आहेत. त्यानुसार तो खर्च संबंधित उमेदवाराने आपल्या एकूण खर्चामध्ये समाविष्ट करणे बंधनकारक आहे.

३.२ **प्रचलित दर निश्चित करणे-** जिल्हाधिकारी यांनी जिल्हानिहाय (आवश्यकता असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय) व महानगरपालिका आयुक्त यांनी संबंधित महानगरपालिकेकरिता, उमेदवारांकडून निवडणुकीमधील ज्या मुख्य बाबींवर खर्च केला जातो, त्या बाबींचे स्थानिक स्तरावर प्रचलित दर हे राजकीय पक्ष यांच्याशी सल्लामसलत करुन निश्चित करावेत. लगतच्या कालावधीत पार पडलेल्या इतर निवडणुकीकरिता दरनिश्चिती झाली असल्यास, त्यामध्ये योग्य भाववाढ विचारात घेऊन सदर दर निश्चित करावेत.

३.३ **प्रचलित दर प्रसिध्द करणे-** जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांनी निश्चित केलेल्या स्थानिक प्रचलित दराची प्रसिध्दी सोबत जोडलेला नमुना क्र.५ नुसार करावी.

४. **अधिकार प्रदान:-**

उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे, निवडणूक यंत्रणेने खर्चाचा हिशोब तपासणे, प्राधिकृत अधिकारी यांनी अनर्हतेचा निर्णय घेणे इ. बाबी सुलभ करुन त्या संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून विहित कालमर्यादेत पूर्ण करणे शक्य व्हावे, याकरिता सुस्पष्ट कार्यपध्दती निश्चित करुन त्यानुसार अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे.

याकरिता राज्य निवडणूक आयोग निवडणूक खर्चाचा हिशोब स्वीकारणे, तपासणे, अनर्हतेबाबत निर्णय घेणे, याबाबतचे अधिकार खालीलप्रमाणे प्रदान करीत आहे:-

| अ. क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | अधिनियमांतर्गत अनर्हतेबाबतची तरतूद | खर्च कोणाकडे सादर करावा | तपासणी अधिकारी | रकाना क्र.३ नुसार अनर्हतेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान केलेले अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | महानगरपालिका | १. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८चे कलम १६ (१ई),<br>२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १० (१ई) | महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी | महानगरपालिका आयुक्त | विभागीय आयुक्त |
| २ | नगरपरिषद ("अ" आणि "ब" वर्ग) | महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगर अधिनियम, १९६५ चे कलम १६(१ ड) | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी | जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले उपजिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ३ | नगरपरिषदा ("क" वर्ग) आणि नगरपंचायत | महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १६(१ ड) | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले उपजिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |
| ४ | जिल्हापरिषद | महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १५-ब (१) | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी | जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले उपजिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ५ | पंचायत समिती | महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ५८(१ ई) | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले तहसीलदार | जिल्हाधिकारी |
| ६ | ग्रामपंचायत | महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम १४-ब (१) | तहसीलदार यांनी प्राधिकृत केलेले मंडळ अधिकारी | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले तहसीलदार | जिल्हाधिकारी |

प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकीपूर्वी संबंधित महानगरपालिका आयुक्त/ जिल्हाधिकारी/ तहसीलदार यांनी वरीलप्रमाणे प्राधिकृत अधिकारी कोण असतील, ते घोषित करावे.

५. **निवडणुकीसाठी निधी स्वीकारणे व खर्च करणे इत्यादी कारणासाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे:-**

५.१ निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने राष्ट्रीयकृत/ शेड्यूल्ड/ सहकारी बँकेत एक स्वतंत्र खाते (बचत किंवा चालू) उघडावे व त्या खात्याचा तपशील नामनिर्देशनपत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

५.२ उमेदवाराने निवडणुकीसंबंधित सर्व आर्थिक व्यवहार हे सदर स्वतंत्र बँक खात्यातूनच करावेत, मात्र प्रत्येक निवडणुकीच्या वेळी नव्याने बँकखाते उघडण्याची आवश्यकता नाही.

५.३ उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत अशा बँक खात्याच्या पासबुकच्या पहिल्या पृष्ठाची प्रत आणि अद्ययावत अकाऊंट स्टेंटमेंटची स्वसाक्षांकित प्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

५.४ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सदर आर्थिक व्यवहार बँक खात्यामधून करताना सर्व व्यवहार जसे देणग्या स्वीकारणे, कर्ज स्वीकारणे, पक्ष निधी मदत, निवडणूक खर्च करणे, देयके अदा करणे इ. सर्व व्यवहार धनादेशाद्वारे (Cheque) अथवा online पध्दतीने करावेत. रोखीने करावयाचे व्यवहार प्राप्तीकर कायद्यातील मर्यादेनुसार असावेत.

५.५ अशा सर्व व्यवहारांची देयके, व्हाऊचर्स, पावत्या इ. उमेदवाराने जतन करून ठेवणे बंधनकारक आहे. सदर कागदपत्रांची प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून अथवा त्यांच्या कार्यालयाकडून मागणी झाल्यास उमेदवारांना ती सादर करणे आवश्यक राहील.

५.६ उमेदवाराचा स्वत:चा निधी, इतरांकडून प्राप्त झालेला निधी, भेटी स्वरूपात प्राप्त झालेल्या वस्तू उदा. बॅनर/पत्रके/निवडणूक प्रचारविषयक साहित्य इत्यादी बाबींची नोंद नमुना क्र.१ मध्ये करणे आवश्यक आहे.

५.७ **उपरोक्त परिच्छेद क्र.५.१, ५.२, ५.३ व ५.४ च्या तरतुदी ग्रामपंचायत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना बंधनकारक असणार नाहीत.** मात्र त्यांनी निवडणुकीसाठी केलेल्या सर्व खर्चाचा हिशोब व इतर व्यवहार जसे देणग्या स्वीकारणे, भेटी स्वीकारणे, निवडणूक साहित्य स्वीकारणे इत्यादींचा तपशील ग्रामपंचायत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी देखील विहित शपथपत्रासह नमुना क्र.१ ते ३ नुसार सादर करणे बंधनकारक असेल.

६. **उमेदवाराने केलेल्या खर्चाचा हिशोब सादर करण्याची कार्यपध्दती:-**

६.१ **निवडणूक दैनंदिन व एकूण निवडणूक खर्च आणि शपथपत्र:-** उमेदवाराने निवडणुकीसाठी केलेल्या खर्चाचा हिशोब भरण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून मोबाईल ॲप्लिकेशन (उदा. True Voter App) व संकेतस्थळावर (Website) ऑनलाईन सुविधा वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येते. उमेदवारांनी दैनंदिन जमा व खर्चाचा हिशोबाची नोंद नमुना क्र. १ व २ मध्ये दररोज करावी. उमेदवारांना निवडणुकीचा दैनंदिन खर्च ऑनलाईन पध्दतीने दररोज भरावयाचा आहे. **दैनंदिन खर्च दररोज कार्यालयात प्रत्यक्ष सादर करावयाची यापूर्वीची अट**

**याद्वारे रद्द करण्यात येत आहे.** मात्र निकाल जाहीर झाल्यानंतर संपूर्ण जमा खर्चाचा हिशोब शपथपत्रासह संबंधित कार्यालयात प्रत्यक्ष सादर करणे बंधनकारक आहे.

६.२ **उमेदवारांना निवडणूक खर्च भरण्यासाठी खालीलप्रमाणे नमुने विहित करण्यात येत आहेत:-**

१) उमेदवाराचा स्वनिधी, प्राप्त निधी व भेट वस्तूंचा तपशील- नमुना १

२) दैनंदिन खर्च व एकत्रित खर्चाचा हिशोब- नमुना २

३) शपथपत्र- नमुना ३

६.३ **मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये निवडणूक खर्च दाखल करणे-** राज्य निवडणूक आयोगाकडून ठरवून देण्यात आलेले मोबाईल ॲप्लिकेशन (उदा. True Voter App) व संकेतस्थळावर (Website) भरलेल्या खर्चाचा तपशील व विहित माहितीचा समावेश असलेल्या नमुना क्र. १ ते ३ यांची प्रिंटआऊट घेवून त्यावर उमेदवाराने स्वाक्षरी करावी. त्यासोबत खर्चाची देयके/ पावत्या/ व्हाऊचर्स इ. च्या स्वसाक्षांकीत झेरॉक्स प्रती जोडण्यात याव्यात. सदर स्वसाक्षांकीत कागदपत्रे **उमेदवाराने स्वत: अथवा त्याच्या प्रतिनिधीमार्फत** सदर आदेशातील परिच्छेद क्र.०४ मधील रकाना क्र.०४ मध्ये दर्शविल्यानुसार नियुक्त प्राधिकृत अधिकाऱ्याकडे, संबंधित निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर, लगतच्या ३० दिवसांच्या आत सादर करावीत व विहित नमुना क्र.४ मध्ये पोहोच घ्यावी.

६.४ **मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये तांत्रिक अडचणी आल्यास-** मोबाईल ॲप्लिकेशन व संकेतस्थळाचा (Website) वापर करण्यामध्ये तांत्रिक अडचणी उद्भवल्यास सर्व संबंधित उमेदवारांनी सदर आदेशात विहित केलेले नमुना क्र.१ ते ३ मध्ये आवश्यक तपशील भरून, त्यासोबत वर नमूद केलेली कागदपत्रे जोडून त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करून सदर कागदपत्रे परिच्छेद क्र.०४ मधील रकाना क्र.०४ मध्ये दर्शविल्यानुसार नियुक्त प्राधिकृत अधिकाऱ्याकडे, संबंधित निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर लगतच्या ३० दिवसांची मुदत संपल्यानंतर, पुढील १५ दिवसांच्या आत सादर करावित. कागदपत्रे सादर केल्यानंतर संबंधित कार्यालयाची विहित नमुना क्र.४ मध्ये पोहोच घ्यावी.

६.५ **निवडणूक खर्चाचा हिशोब कोणी सादर करावा-** निवडणूक लढविणाऱ्या ( बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांसह) प्रत्येक उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करावा. उमेदवाराने एकापेक्षा अधिक प्रभाग/ निवडणूक विभाग/ निर्वाचक गणातून निवडणूक लढविल्यास त्या- त्या प्रभाग/ निवडणूक विभाग/ निर्वाचक गणाकरिता भरण्यात आलेल्या निवडणूक खर्चाचा प्रभागनिहाय तपशील विहित नमूने क्र.१ ते ३ मध्ये स्वतंत्रपणे सादर करणे आवश्यक राहील. **मात्र ज्या प्रभाग / निवडणूक विभाग / निर्वाचक गणातून उमेदवारी मागे घेतली असेल, त्या प्रभाग/ निवडणूक विभाग/ निर्वाचक गणाकरिता निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्याची आवश्यकता नाही.**

**७. निवडणूक खर्च स्वीकारणारे अधिकारी (परिच्छेद क्र.०४ मधील तक्त्यातील रकाना क्र.०४) यांनी करावयाची कार्यवाही:-**

७.१ **खर्चाचा हिशोब सादर केल्यानंतर पोहोच देणे-** उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब (नमुना क्र.१ ते ३ सोबत) सादर केल्यानंतर संबंधित कार्यालयाने सदर उमेदवारास विहित नमुना क्र.४ नुसार पोहोच देणे बंधनकारक असेल. उमेदवार आणि संबंधित कार्यालयाने सदर कागदपत्रे व पोहोच व्यवस्थित जतन करणे आवश्यक आहे.

७.२ **किती उमेदवारांनी खर्च सादर केला याचा आढावा घेणे-** उमेदवारांनी निवडणुकीत केलेल्या खर्चाचा हिशोब सादर करण्याची मुदत संपल्यानंतर संबंधित अधिकारी यांनी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपैकी किती उमेदवारांनी खर्चाचा हिशोब सादर केला आहे व किती उमेदवारांनी केला नाही, याचा आढावा घ्यावा.

७.३ **उमेदवारांच्या. खर्च तपशिलात त्रुटी असल्यास करावयाची कार्यवाही-** विहित मुदतीत निवडणूक खर्च सादर केलेल्या उमेदवारांची कागदपत्रे तपासून त्यामध्ये काही त्रुटी असल्यास त्याची पूर्तता करण्याबाबत सदर उमेदवारास, संबंधित अधिकारी यांनी निवडणूक खर्चाची कागदपत्रे सादर करण्यासाठी परिच्छेद ६.३ अथवा ६.४ मध्ये विहित केलेली मुदत संपल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत नोटीस द्यावी. संबंधित उमेदवारास सदरची नोटीस मिळाल्यानंतर त्या पुढील १५ दिवसांत त्रुटींची पूर्तता करण्याची संधी देण्यात यावी.

७.४ **उमेदवारांनी विहित मुदतीत हिशोब सादर न केल्यास-** ज्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा कोणताही हिशोब (नमुना क्र.१ ते ३) सादर केलेला नाही अशा उमेदवारांना, खर्च स्वीकारणाऱ्या संबंधित अधिकारी यांनी खर्चाचा हिशोब सादर करण्यासाठी **"खर्चाचा हिशोब विहित नमुन्यात व आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा"** अशा आशयाची नोटीस परिच्छेद ६.३ अथवा ६.४ मध्ये नमूद केलेली विहित मुदत संपल्याच्या दिनांकापासून पुढील १५ दिवसात काढावी. संबंधित उमेदवाराने नोटीस मिळाल्यापासून पुढील १५ दिवसांच्या आत विलंबाच्या खुलाशासह सदर हिशोब सादर करण्यासाठी कळवावे.

७.५ **उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची माहिती तपासणी अधिकारी यांना सादर करणे-** वरील प्रमाणे वाजवी संधी देवूनही निवडणुकीच्या खर्चाचा हिशोब सादर न करणाऱ्या आणि त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या उमेदवारांचे अनर्हतेचे प्रस्ताव तयार करण्यासाठी सर्व कागदपत्रे यथास्थिती परिच्छेद ६.३, ६.४, ७.३ व ७.४ मध्ये नमूद केलेली विहित मुदत संपल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत संबंधित तपासणी अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावीत.

**८. तपासणी अधिकारी (परिच्छेद क्र.०४ मधील तक्त्यातील रकाना क्र.०५) यांनी करावयाची कार्यवाही:-**

८.१ **उमेदवाराचा खर्च सूचना फलकावर प्रसिद्ध करणे-** उमेदवाराने सादर केलेला निवडणूक खर्च परिच्छेद-०४ मधील रकाना क्र.०५ मध्ये दर्शविलेल्या प्राधिकृत तपासणी अधिकारी यांनी सूचना

फलकावर प्रसिद्ध करावा. याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा निवडणूक संनियत्रण यंत्रणेने काही आक्षेपार्ह बाबी नजरेस आणल्या तर तपासणी अधिकारी यांनी याबाबत संबंधित उमेदवारांना नोटीस देऊन, त्याची बाजू ऐकून, जिल्हाधिकारी अथवा महानगरपालिका आयुक्त यांनी परिच्छेद ३.१ नुसार वेळोवेळी निश्चित केलेल्या दरपत्रकाशी तुलना करून, झालेला खर्च योग्य आहे किंवा कसे, याची चौकशी / खात्री करून निर्णय घ्यावा. दरपत्रकापेक्षा कमी खर्च दाखविण्यात आला असेल किंवा खर्च लपविण्यात आला असेल तर दरपत्रकाप्रमाणे खर्च ग्राह्य धरण्यात यावा.

८.२ **अनर्हतेचे प्रस्ताव सादर करणे-** तपासणीअंती ज्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर केला नाही अथवा सूचना दिल्यानंतरदेखील त्रुटींची पूर्तता केली नाही, अशा सर्व उमेदवारांच्या बाबतीत संबंधित तपासणी अधिकारी यांनी अभिप्रायासह परिच्छेद क्र.०४ मधील रकाना क्र.०६ मध्ये दर्शविलेल्या प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे अनर्हतेचा प्रस्ताव सादर करावा. या प्रस्तावासोबत निवडणूक लढविणारे सर्व उमेदवार (बिनविरोधसह), त्यापैकी निवडणूक खर्च सादर करणारे, सादर न करणारे अथवा हिशोबात त्रुटी असणारे अशा सर्व उमेदवारांची नमुना क्र. ०६ नुसार प्रमाणित यादी जोडावी.

८.३ **प्राप्त प्रस्ताव सादर करण्याकरिता तपासणी अधिकारी यांच्यासाठी मुदत-** संबंधित प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तपासणी अधिकारी यांनी शक्यतो ३० दिवसांत, राज्य निवडणूक आयोगाने अनर्हतेबाबत निर्णय घेण्यासाठी परिच्छेद क्र.०४ मधील रकाना ०६ मध्ये नमूद केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडे प्रस्ताव सादर करावेत.

९. **अनर्हतेबाबत निर्णय घेण्याकरिता प्राधिकृत अधिकाऱ्यांनी (परिच्छेद क्र.०४ मधील तक्त्यातील रकाना क्र.०६) करावयाची कार्यवाही:-**

९.१ **निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्च सादर न केल्यास-** निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने विहित केलेल्या मुदतीत व रितीने निवडणूक खर्च सादर न केल्यास अशा उमेदवारांना अनर्ह ठरविण्याबाबत खालील प्रक्रियेचे पालन करुन योग्य निर्णय घ्यावा.

९.२ **अनर्हतेच्या प्रस्तावाची छाननी करणे-** अनर्हता आदेश काढण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाने परिच्छेद क्र.०४ मधील रकाना ०६ मध्ये नमूद केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याने प्राप्त प्रस्तावांची छाननी करून, त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्याची पूर्तता करण्यासाठी तपासणी अधिकाऱ्यांना कळवावे.

९.३ **सुनावणी घेणे-** तपासणी अधिकाऱ्यांकडून आवश्यक ती पूर्तता होताच प्रकरण दाखल करून घेऊन सुनावणीची तारीख निश्चित करावी. ज्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर केला नाही, अशा प्रत्येक उमेदवाराच्या अनर्हतेबाबत निर्णय घेण्यासाठी प्राधिकृत अधिकारी यांनी व्यक्तिशः सुनावणी घ्यावी. **सुनावणी घेण्याचे अधिकार इतर अधिकाऱ्यांना प्रदान करता येणार नाहीत.**

९.४ **नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन करणे-** प्राधिकृत अधिकारी (जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त) यांनी अनर्हतेचे निर्णय घेण्यापूर्वी नैसर्गिक न्याय तत्वाचे (Principles of Natural Justice) पालन करावे.

९.५ **अनर्हतेचे आदेश-** प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अशी प्रकरणे दाखल झाल्यापासून शक्यतो ६० दिवसांत संबंधितांना सुनावणी देऊन व यथायोग्य आदेश पारित करून ती निकाली काढावीत. सदर आदेश बोलके (Speaking Order) व स्वयंस्पष्ट असावेत. प्राधिकृत अधिकारी यांनी सुनावणीअंती अनर्ह ठरणाऱ्या प्रत्येक उमेदवारासाठी स्वतंत्र आदेश निर्गमित करावेत. **"सदर आदेशाने व्यथित झालेल्या उमेदवारास, आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत राज्य निवडणूक आयोगाकडे विशेष अर्ज दाखल करता येईल"** ही बाब आदेशात स्पष्टपणे नमूद करावी.

९.६ **अनर्ह ठरणाऱ्या उमेदवारांची नावे शासन राजपत्रात प्रसिध्द करणे-** एखाद्या उमेदवाराला अनर्ह ठरविल्याबाबत आदेश पारित केल्यानंतर, असे अनर्ह ठरणाऱ्या सर्व उमेदवारांची नावे संबंधित विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांनी शासन राजपत्रात ७ दिवसांत प्रसिध्द करावित.

९.७ **खर्चाचा हिशोब सादर करण्यात आले नसल्याबाबतची तक्रार-** निवडणूक खर्च सादर केले नसल्याची तक्रार प्राप्त झाल्यास, सदर तक्रारीची संबंधित तपासणी अधिकारी यांच्यामार्फत तातडीने प्राथमिक चौकशी पूर्ण करून त्यात तथ्य आढळल्यास वर नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

## १०. अनर्हता दूर करणे अथवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याचे अधिकार:-

१०.१ **आयोगाचे अधिकार-** मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १६ (१फ), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १०(१फ), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १६ (१ ई), महाराष्ट्र जिल्हापरिषदा आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १५-ब (२) व ५८ (१ई) आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १४-ब (२) मधील तरतूदीनुसार अनर्हता दूर करणे, अनर्हतेचा कालावधी कमी करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे विशेषाधिकार आहेत. सदर अधिकार हे राज्य निवडणूक आयोगास स्वतःहून अथवा अनर्ह झालेल्या उमेदवाराच्या विशेष अर्जावरुन वापरता येतात.

१०.२ **विशेष अर्ज-** सदर अधिकार हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमांमध्ये एखाद्या उमेदवाराला अनर्ह ठरविण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्याने (वरील परिच्छेद क्र.०४ रकाना क्र.०६ नुसार अधिकार प्रदान केलेले प्राधिकारी) पारित केलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीने दाखल करावयाचा 'विशेष अर्ज' व 'अपील' हे संपूर्णपणे भिन्न आहेत. सबब, खर्चाचा हिशोब सादर न केल्यामुळे अनर्ह झालेल्या उमेदवाराने राज्य निवडणूक आयोगाकडे केवळ 'विशेष अर्ज' दाखल करणे आवश्यक आहे.

१०.३ **विशेष आदेश**- राज्य निवडणूक आयोगाकडे अनर्हता दूर करणे अथवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याबाबत केलेल्या विनंती अर्जास 'विशेष अर्ज' आणि त्यावर देण्यात आलेल्या आदेशास 'विशेष आदेश' असे संबोधण्यात येईल.

१०.४ **राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय अंतिम**- अनर्हता दूर करणे अथवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित आहेत. राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त विशेष अर्जावर घेण्यात येणाऱ्या सुनावणीच्या वेळी संबंधित कार्यालयाने/ उमेदवाराने खर्च दाखल करतेवेळी दिलेली कागदपत्रे व त्याची पोहोच तसेच उमेदवाराला वेळोवेळी दिलेल्या नोटीस इ. कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. राज्य निवडणूक आयोगाने सदर विशेषाधिकार वापरुन पारित केलेले आदेश अंतिम असतील.

१०.५ **सदर आदेश हे या आदेशाच्या दिनांकानंतर होणाऱ्या सर्व सार्वत्रिक व पोटनिवडणुकांकरिता लागू असतील.**

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

१५.०२.२०२४

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई.
२. प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई.
३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
४. विभागीय आयुक्त (सर्व)
५. जिल्हाधिकारी (सर्व)
६. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
७. नगरपरिपदा/ नगर पंचायतींचे संबंधित मुख्याधिकारी (सर्व)/ प्रशासक तथा तहसीलदार
८. राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनेलवरील सर्व वकील
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१०. निवड नस्ती

## नमुना - १

### उमेदवाराला प्राप्त निधी / देणगी बाबतचा तपशील (स्वनिधी, पक्ष निधी, भेट, कर्ज, इ.)

उमेदवाराचे नाव :

जिल्हयाचे नाव :

पक्षाचे नाव :

सार्वत्रिक /पोट निवडणूक :

स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :

निकाल घोषित केल्याचा दिनांक :

प्रभाग/गण/ गट क्रमांक

जागा/ seat क्र.

| अ. क्र. | निधी / देणगी देणाऱ्याचे नाव व पत्ता | निधी / देणगी देणाऱ्याचा संपर्क क्रमांक | दिनांक | रोख/ चेक/ डीडी/ इतर प्रकारे | देणाऱ्याच्या बँकेचे नाव व शाखा | निधी / देणगीचा प्रकार | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | एकूण | |

(निकाल घोषित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर करावा.)

स्वाक्षरी

दिनांक:-

उमेदवाराचे नाव

टीप:

यामध्ये पुढील बाबींचा समावेश करावा-

१) रोख रक्कम, धनादेश, ऑनलाईन इत्यादी स्वरुपाचा स्वपक्ष, इतर पक्ष, हितचिंतक आदींकडून प्राप्त झालेला निधी.

२) वस्तु रूपाने उदा. बॅनर्स, पोस्टर्स, झेंडे, ध्वनिचित्रफिती इत्यादी स्वरुपात स्वपक्ष, इतर पक्ष, हितचिंतक आदींकडून प्राप्त वस्तू.

३) प्रसार माध्यमांवरील उदा. मुद्रित, दृकश्राव्य, डिजिटल, सोशल मीडिया इत्यादींद्वारे स्वपक्ष, इतर पक्ष, हितचिंतक आदींकडून एकत्रितरीत्या करण्यात आलेल्या जाहिरातींवरील खर्च.

४) सेवा स्वरूपात उदा. पक्षातर्फे एकत्रितपणे मिरवणुका, रोड शो, प्रचार सभा, वाहनांवरील व्यवस्था, खानपान व्यवस्था इत्यादींसाठी करण्यात येणारा खर्च.

# नमुना - २

## उमेदवाराने केलेल्या खर्चाचा तपशील

उमेदवाराचे नाव : जिल्ह्याचे नाव:

पक्षाचे नाव : सार्वत्रिक /पोटनिवडणूक:

स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव: निकाल घोषित केल्याचा दिनांक:

प्रभाग/ गण/ गट क्रमांक

जागा/ seat क्र.

| अ.क्र. | दिनांक | खर्चाची बाब | देयक/ पावती/ व्हाऊचर क्रमांक | रक्कम कोणास अदा केली | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | एकूण | |

(निकाल घोषित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर करावा.)

स्वाक्षरी

दिनांक:- उमेदवाराचे नाव

राजकीय पक्षातर्फे निवडणुकीत उमेदवारांसाठी एकत्रित खर्च करण्यात येतो. सदर खर्च संबंधित उमेदवारांमध्ये विभाजित करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे स्वतंत्र आदेश आहेत. त्यानुसार तो खर्च संबंधित उमेदवाराने आपल्या एकूण खर्चामध्ये समाविष्ट करणे बंधनकारक आहे.

## नमुना -३

## उमेदवाराचे शपथपत्र

मी (नाव)........................वडिलाचे/ आईचे/ पतीचे नाव .................................. वय ............... वर्ष ............, राहणार ....................... पुढीलप्रमाणे या शपथपत्राद्वारे जाहीर करतो/ करते की,

१. मी .............................. महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायत/ जिल्हापरिषद/ पंचायत समिती/ ग्रामपंचायतीच्या ............... - प्रभाग क्रमांक/ गट/ गण .................. मधून सार्वत्रिक/ पोटनिवडणूक ..................... मधून............. या जागेसाठी निवडणूक लढविली होती व तिचा निकाल दिनांक .................रोजी घोषित करण्यात आला होता. सदर निकालानुसार मी विजयी / पराभूत झालो आहे/ मी बिनविरोध निवडून आले/आलेलो आहे. (लागू नसेल ते खोडावे)

२. मी/ माझ्या प्रतिनिधीने नामनिर्देशन दिनांक.............. ते निकाल घोषित करण्यात आलेल्या दिनांक ............(दोन्ही दिवस धरुन) या काळात केलेले सर्व निवडणूक खर्चाचे खरे व बिनचूक हिशोब ठेवलेले आहेत; तसेच खर्चाचे पूरक पुराव्याचे कागददेखील जतन केले आहेत.

३. मी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशातील सर्व निदेशाचे तंतोतंत पालन केलेले आहे, अशी खात्री देतो.

४. मी सादर केलेल्या खर्चामध्ये कोणतीही बाब लपवून ठेवलेली नाही किंवा रोखून ठेवलेली नाही.

५. मी स्वतः केलेला खर्च, पक्षाने माझ्यासाठी केलेला खर्च व इतर व्यक्तींनी माझ्यासाठी केलेला खर्च संपूर्णपणे खरा व अचुकपणे मी माझ्या एकूण खर्चात अंतर्भूत केलेला आहे.

६. मी निवडणुकीकरिता देणगी, भेटी, कर्ज, पक्ष निधी इत्यादी स्वरुपात गोळा केलेल्या निधीचा अचूक तपशील सादर केला आहे. हा सर्व निधी स्वखुशीने देण्यात आलेला आहे.

७. मी ठेवलेली हिशोबाची पुस्तके व त्यासंबंधातील खर्चाच्या पृष्ठ्यर्थ ठेवलेली पावती/ बील/ व्हाऊचर इ. यांच्या मूळ प्रती, मी निवडणूक अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मागणीनुसार पडताळणीसाठी न चुकता व विनाविलंब सादर करील.

८. मी पेड न्यूजचा अवलंब केलेला नाही.

मी शपथेवर सांगतो की, वर वर्णन केलेली माहिती खरी असून कोणतीही माहिती खोटी व लपवून ठेवलेली नाही.

उमेदवाराची स्वाक्षरी:-.............................

नाव:- ................................................

दिनांक:- ............................................

टिप:- शपथपत्र स्टँप पेपरवर सादर करण्याची आवश्यकता नसून साध्या कागदावर तयार करुन सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन करुन सादर करावे.

## नमुना -४

## उमेदवारांनी सादर केलेल्या खर्चाचा हिशोब स्वीकारतांना उमेदवाराला द्यावयाची पोच पावती

### कार्यालयीन वापराकरिता:-

| | |
|---|---|
| **उमेदवाराचे नाव:-** ------------------------------- | |
| स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव:- ------------------------ | . प्रभाग क्र:- |
| तालुका:- | जिल्हा:- |
| निकाल घोषित केल्याचा दिनांक:- | |
| खर्चाचा हिशोब सादर केल्याचा दिनांक:- | |
| नमुना क्र १ -- जोडला आहे/ नाही | |
| नमुना क्र २ -- जोडला आहे/ नाही | |
| नमुना क्र ३ -- जोडला आहे/ नाही | |
| उमेदवार/ प्रतिनिधी यांची स्वाक्षरी:- | |
| खर्चाचा हिशोब स्वीकारणाऱ्या प्राधिकृत अधिकारी/कर्मचारी याचे नाव:- | -------------------------------------------------------- |
| पद:- | |
| प्राधिकृत अधिकारी/ कर्मचारी यांची दिनांकासह स्वाक्षरी:- | |
| कार्यालयीन शिक्का | |

------------------------------------------------------------------------------------------------

### उमेदवारास द्यावयाची पोहोच:-

| | |
|---|---|
| **उमेदवाराचे नाव:-** ------------------------------- | |
| स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव:- ------------------------ | प्रभाग क्र:- |
| तालुका:- | जिल्हा:- |
| निकाल घोषित केल्याचा दिनांक:- | |
| खर्चाचा हिशोब सादर केल्याचा दिनांक:- | |
| नमुना क्र १ -- जोडला आहे/ नाही | |
| नमुना क्र २ -- जोडला आहे/ नाही | |
| नमुना क्र ३ -- जोडला आहे/ नाही | |
| उमेदवार/ प्रतिनिधी यांची स्वाक्षरी:- | |
| खर्चाचा हिशोब स्वीकारणाऱ्या प्राधिकृत अधिकारी/ कर्मचारी याचे नाव:- | -------------------------------------------------------- |
| पद:- | |
| प्राधिकृत अधिकारी/ कर्मचारी यांची दिनांकासह स्वाक्षरी:- | |
| कार्यालयीन शिक्का | |

<table>
<tr><td colspan="5" align="center">नमुना - ५</td></tr>
<tr><td colspan="5" align="center">स्थानिक प्रचलित दर</td></tr>
<tr><td colspan="5">जिल्ह्याचे / महानगरपालिकेचे नाव -</td></tr>
<tr><td colspan="5">सार्वत्रिक/ पोटनिवडणूक -</td></tr>
<tr><td colspan="5">मतदानाचा दिनांक -</td></tr>
<tr><td colspan="5">स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव -</td></tr>
<tr><td colspan="5">जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने व राजकीय पक्षांच्या उपस्थितीत; तसेच मान्यतेने निश्चित केलेले स्थानिक प्रचलित दर</td></tr>
<tr><th>अ.क्र.</th><th>खर्चाची मुख्य बाब</th><th>खर्चाची आंतर बाब</th><th>तपशील /voucher</th><th>स्थानिक प्रचलित दर</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td></tr>
<tr><td rowspan="13">१</td><td rowspan="13">प्रचारादरम्यान भाडे खर्च</td><td>प्रचार कार्यालय</td><td></td><td></td></tr>
<tr><td>प्रचार मैदाने</td><td></td><td></td></tr>
<tr><td>प्रचारातील वाहने</td><td></td><td></td></tr>
<tr><td>उमेदवाराची वाहने</td><td></td><td></td></tr>
<tr><td>कार्यालयीन वाहने</td><td></td><td></td></tr>
<tr><td>विविध प्रतिनिधींना दिलेले वाहने</td><td></td><td></td></tr>
<tr><td>जाहिरातीची ठिकाणे</td><td></td><td></td></tr>
<tr><td>व्यासपीठ</td><td></td><td></td></tr>
<tr><td>मंडप</td><td></td><td></td></tr>
<tr><td>बुथ</td><td></td><td></td></tr>
<tr><td>खुर्ची, टेबल इ.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>विविध इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रीकल उपकरण</td><td></td><td></td></tr>
<tr><td>इतर अनुषंगिक खर्च</td><td></td><td></td></tr>
<tr><td rowspan="7">२</td><td rowspan="7">प्रचार कार्यालयावरील खर्च</td><td>प्रचारकांचा भत्ता</td><td></td><td></td></tr>
<tr><td>प्रतिनिधी भत्ता</td><td></td><td></td></tr>
<tr><td>मतदान प्रतिनिधी भत्ता</td><td></td><td></td></tr>
<tr><td>मतमोजणी प्रतिनिधी भत्ता</td><td></td><td></td></tr>
<tr><td>दूरध्वनी/ भ्रमणध्वनी खर्च</td><td></td><td></td></tr>
<tr><td>वीज/ पाणी/ चहा खर्च</td><td></td><td></td></tr>
<tr><td>इतर कार्यालयीन खर्च</td><td></td><td></td></tr>
<tr><td rowspan="7">३</td><td rowspan="7">प्रचार साहित्यावरील खर्च</td><td>जाहीरनामा छपाई व वितरण</td><td></td><td></td></tr>
<tr><td>वैयक्तिक माहिती पुस्तिका</td><td></td><td></td></tr>
<tr><td>पोस्टर छपाई व वितरण</td><td></td><td></td></tr>
<tr><td>हॅन्डबील छपाई व वितरण</td><td></td><td></td></tr>
<tr><td>भिंतीवरील प्रचाराचे लिखाण</td><td></td><td></td></tr>
<tr><td>व्होटर स्लिप</td><td></td><td></td></tr>
<tr><td>इतर साहित्य खर्च</td><td></td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | खर्चाची मुख्य बाब | खर्चाची आंतर बाब | तपशील /voucher | स्थानिक प्रचलित दर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ४ | प्रसार माध्यमावरील खर्च | वर्तमान पत्रातील जाहिरात खर्च | | |
| | | होर्डिंग खर्च | | |
| | | ऑडिओ जाहिरात | | |
| | | व्हिडिओ जाहिरात | | |
| | | एसएमएस | | |
| | | केबल टीव्ही | | |
| | | संकेत स्थळ इ. इंटरनेट माध्यम | | |
| | | सोशल मीडिया | | |
| | | रेडिओ /एफएम | | |
| | | प्रवेशद्वाराची कमान | | |
| | | टीव्ही चॅनेल | | |
| | | इतर प्रचार माध्यम | | |
| ५ | प्रचारावरील खर्च | मिरवणूक/रोड शो (रॅली) | | |
| | | जनसभा/प्रचारसभा | | |
| | | व्हीआयपीवरील खर्च | | |
| | | सजावट खर्च | | |
| | | इतर खर्च | | |
| ६ | खानपान | प्रचारातील खानपान | | |
| | | मतदान प्रतिनिधी खानपान | | |
| | | मतमोजणी प्रतिनिधी खानपान | | |
| | | कार्यकर्ता खानपान | | |
| | | इतर खर्च | | |
| ७ | इतर खर्च (जे वरील बाबीत मोडत नाहीत) | | | |

जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांची स्वाक्षरी

दिनांक

टीप -

१. सदर दर हा समितीचे सदस्य व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत निश्चित करण्यात आलेले आहेत.

२. उमेदवाराने जर स्थानिक प्रचलित दरापेक्षा कमी दराने खर्च केला तर त्या उमेदवाराला प्रचलित दरापेक्षा कमी दर का दाखविण्यात आले आहेत यांच्या कागदपत्रांच्या पुराव्यासह योग्य कारण देणे आवश्यक राहील.

## नमुना - ६

### तपासणी अधिकारी यांनी प्राधिकृत अधिकारी यांना अनर्हतेच्या प्रस्तावासोबत सादर करावयाच्या यादीचा नमुना

जिल्ह्याचे/ महानगरपालिकेचे नाव -

स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव -

सार्वत्रिक/ पोटनिवडणूक -

निकाल घोषित केल्याचा दिनांक -

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | निवडणूक खर्च सादर केल्याचा दिनांक | निवडणूक खर्च दाखल न केलेल्या उमेदवाराला नोटीस दिल्याचा दिनांक | हिशोबात त्रुटी असल्यास नोटीस दिल्याचा दिनांक | निवडणूक खर्च विहित कालावधीत सादर न केल्यास अनर्ह ठरतो किंवा नाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

स्वाक्षरी
तपासणी अधिकाऱ्याचे नाव
पदनाम

टिप - अनर्हतेच्या प्रस्तावासोबत उपरोक्त नमुन्यातील यादी जोडावी.